आदिवासी उपयोजना क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन,
आदिवासी विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक: आस्था-१०९३/प्र.क्र.२५१/का-१५,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२, दिनांक २९ डिसेंबर, १९९३.

वाचा: १] शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक-टीएसपी १०८६/८७१०/प्र.क्र.३१/कार्यासन-५, दिनांक ९ मार्च, १९९०.
२] शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक: आस्था-१०९२/प्र.क्र.५८/कार्यासन-१५, दिनांक २ मे, १९९२.
३] शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांक : आस्था/१०९३/प्र.क्र.२०४/कार्यासन-१५, दिनांक ९ नोव्हेंबर, १९९३.

शासन निर्णय :

प्रस्तावनेत क्रमांक-२ येथे उल्लेखिलेल्या शासन निर्णयान्वये आदिवासी क्षेत्रातील अतिदुर्गम भागातील १३ जिल्ह्यांतील १७७२ विनिर्दिष्ट गावांत कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिनांक १ मे, १९९२ पासून पुढील दराने प्रोत्साहन भत्ता देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

| वेतनश्रेणी | | दरमहा रुपये |
| --- | --- | --- |
| मूळ वेतन रु. ९५०/- पेक्षा कमी | .. | रु. १००/- |
| ९५०/- ते १४९९ | .. | रु. २००/- |
| १५००/- ते १९९९ | .. | रु. ३००/- |
| २०००/- ते २९९९ | .. | रु. ४००/- |
| ३०००/- ते अधिक | .. | रु. ५००/- |

२. वरील दराने प्रोत्साहन भत्ता देण्यासाठी १३ जिल्ह्यांतील अतिदुर्गम क्षेत्रातील १७७२ गावे निश्चित करण्यात आली होती. वरील दराप्रमाणे देय प्रोत्साहन भत्ता १ मे, १९९२ पासून अंमलात येऊन आठव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत अंमलात राहील, असेही उक्त शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले होते.

३. अमरावती जिल्ह्याच्या मेळघाट परिसरात आणि ठाणे जिल्ह्याच्या मोखाडा परिसरात नुकत्याच झालेल्या दुर्दैवी बालमृत्यूच्या संदर्भात आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या प्रकल्प यंत्रणेचे बळकटीकरण करण्याचा आणि आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या शासकीय कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. प्रकल्प यंत्रणेच्या बळकटीकरणाचे आदेश प्रस्तावनेत उल्लेखित क्रमांक ३ च्या शासन निर्णयाद्वारे निर्गमित करण्यात आले आहेत.

४. आता आदिवासी क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या शासकीय कर्मचारी आणि अधिकारी यांना प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्यासंबंधी शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

[१] प्रस्तावनेत क्रमांक-१ येथे उल्लेखित दिनांक ९ मार्च, १९९० च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्र निर्धारित करण्यात आले आहे. त्यानुसार राज्याच्या ठाणे, रायगड, नाशिक, धुळे, जळगांव, अहमदनगर, पुणे, नांदेड, अमरावती, नागपूर, भंडारा, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली या १४ जिल्ह्यांतील एकूण ६९६२ गावे व १३ शहरे आदिवासी उपयोजना क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आली आहेत. यातील ५९९४ गावे व १२ शहरे मुख्य आदिवासी उपयोजना क्षेत्रात[अनुसूचित क्षेत्रात].

....२